REGISTERED No. B 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, **अर्थ**,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
**एक आणा.**

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख ६ एप्रिल, १९३८ अंक १४

**रामनवमीचीच झिम्मड ! चिक्कार गर्दी ! अपूर्व स्वागत !!**

**आनंदी आनंद ! शेकडों भाविक भजनरंगांत दंग झाले ! 'लीला'च्या गोड गायनानें गुंग झाले ! कामण्णाची करामत पाहून खोः खोः हंसले !!!**

**स्त्रियांच्या झुंडीच्या झुंडी लोटत आहेत !**

## विठ्ठलानें पुरविलें कोड ।
## उगवलें कान्होपात्रेचें झाड ॥

कान्होपात्रेच्या भक्तीवर प्रसन्न होऊन पांडुरंगानें पंढरपुरांत कान्होपात्रेचें झाड निर्माण करून तिला अजरामर करून ठेवलें, ही पवित्र कथा प्रत्यक्ष स्वरूपांत कान्होपात्रा बोलपट दाखवील !



( वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि.च्या खास व्यवस्थेखालील )

रे—मार्केटजवळ पुणें. ) **मिनर्व्हा** ( टे. नं. ३०८

शनिवार ता. २ पासून सुरू. दररोज दोन खेळ: ३॥ व १० वा.
शुक्रवार ता. ८ रोजीं रामनवमीनिमित्त खास जादा खेळ दु. ३॥ वा.

शालिनी सिनेटोनचा मराठी बोलपट

# -कान्होपात्रा-

**दिग्दर्शक—भाल. जी. पेंढारकर**

**भूमिकाः—लीला, लोंढे, कोल्हटकर, कामण्णा**

# विविध माहिती

**बँकांस सुटी**

शुक्रवार, ता. ८ एप्रिल, १९३८ रोजीं रामनवमीनिमित्त बँका बंद राहतील.

**माकडें अमेरिकेस गेलीं**

गेल्या आठवड्यांत व्हेनिस नांवाच्या आगबोटीनें २३ पिंजऱ्यांमध्यें घातलेलीं ५१५ माकडें न्यूयॉर्कला रवाना झालीं.

**इंपीरियल बँकेचें खेळतें भांडवल**

इंपीरिअल बँक ऑफ इंडियाचा एकूण खेळत्या भांडवलाचा गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेला आंकडा ९१ कोटि १३ लक्ष रुपये इतका होता. ह्यांत ८० कोटि रुपयांचे वर ठेवी होत्या.

**प्रसिद्ध ब्रिटिश प्रवाशाचें हिंदुस्थानाविषयीं मत**

• देशाचा अफाट विस्तार, असंख्य कष्टाळू शेतकरी आणि प्रेमळ आतिथ्य ह्या तीन गोष्टी हिंदुस्थानांतील प्रवासांत आपल्या मनावर प्रामुख्यानें ठसल्या असें स्वदेशीं परत जातांना मि. सॉमरसेट मॉघॅम ह्या प्रसिद्ध ब्रिटिश लघुकथालेखकानें बोलून दाखविलें.

**अन्नाच्या पौष्टिकपणाविषयीं चौकशी**

विद्यार्थी वर्गाच्या नेहमीच्या अन्नांत पौष्टिकपणा किती असतो ह्याविषयीं चौकशी करण्याचें बंगालच्या प्रांतिक-सरकारनें ठरवलें आहे.

**पॅलेस्टाइनच्या फाळणीबाबत तपशीलवार सूचना करण्याकरितां कमिटी**

पॅलेस्टाइनची ज्यू व अरब विभागांत फाळणी करावी, असें पील कमिशननें गेल्या वर्षी सुचविलें होतें. आतां ह्या फाळणीची तपशीलवार योजना आखण्याचें काम एका कमिटीकडे सोपवण्यांत आलें आहे.

**मि. मॅक्डोनॉल्ड ह्यांची मालमत्ता**

ग्रेट ब्रिटनचे एक माजी मुख्य प्रधान व मजूर पक्षाचे पुढारी मि. मॅक्डोनॉल्ड ह्यांनीं आपल्या मागें ३½ लक्ष रुपयांची मालमत्ता ठेवली, तिचेवर ३५ हजार रुपये इस्टेट ड्युटी (कर) बसली.

**ग्रेट ब्रिटनमधील सायकली**

ग्रेट ब्रिटनमधील रस्त्यांची लांबी १ लक्ष ७८ हजार मैल असून त्यांवर सुमारें १ कोटि पायगाड्या संचार करीत असतात. म्हणजे, प्रत्येक मैलागणिक ५० सायकली, असें प्रमाण पडतें.

**ग्रामोन्नतीप्रीत्यर्थ मध्यवर्ती सरकारची ग्रँट**

ग्रामोन्नतीच्या योजना प्रांतिक सरकारांस हातीं घेतां याव्या, ह्यासाठी मध्यवर्ती सरकारनें १९३६ सालीं प्रथम ९२½ लक्ष रुपयांची ग्रँट मंजूर केली. १९३७ सालीं पुनः १ कोटि ३ लक्ष रुपये प्रांतिक सरकारांत वांटण्याचें ठरलें. प्रांतांतील योजनांची प्रगति होईल, त्या मानानें त्यांस ग्रँट मिळावयाची आहे. अद्याप ९०½ लक्ष रुपये त्यांचेमध्यें वांटले जावयाचे आहेत. मुंबई प्रांतानें नोव्हेंबर, १९३७ अखेर ह्या ग्रँटमधून ३ लक्ष ८१ हजार रुपये खर्च केले.

**दारूबंदीस प्रारंभ**

मुंबई प्रांतिक सरकारनें ता. १ एप्रिल रोजीं दारूबंदीच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यास प्रारंभ केला. उत्तर, मध्य व दक्षिण विभागांतील प्रत्येकीं दोन तालुक्यांत दारूस पूर्ण बंदी झाली आहे.

**बॉंबे टेलिफोन कं. लि.**

वरील कंपनीस गेल्या वर्षी २४½ लक्ष रुपये नफा झाला. टेलिफोनच्या भाड्याचें उत्पन्न ४३½ लक्ष रुपये झालें. कंपनीनें ३½ लक्ष रुपये प्राप्तीवरील कर व सुपर टॅक्स भरला. भागीदारांस ८ टक्के डिव्हिडंड जाहीर झालें.

**ट्रेझरी बिलांवर १ रु. ८ आ. ९ पै व्याजाचा दर**

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. ८ आ. ९ पै इतका पडला.

**हैद्राबाद संस्थानांतील खेडीं**

हैद्राबाद संस्थानांत एकवीस हजार खेडीं आहेत.

**देशी वैद्यकीचें नियंत्रण**

वैद्य व हकीम ह्यांच्या धंद्याचें नियंत्रण करणारें मुंबई सरकारचें बिल प्रांतिक असेंब्लीच्या सिलेक्ट कमिटीकडे गेलें आहे.

**साखरेवरील जकात**

साखरेच्या धंद्यास हिंदुस्थान सरकारनें दिलेल्या संरक्षणाची मुदत ३१ मार्च, १९३८ अखेर संपत होती, ती आतां एक वर्ष वाढविण्यांत आली आहे. सध्याच्या दरानें, आयात होणाऱ्या प्रत्येक हंड्रेडवेट साखरेवर ९ रु. १ आणा जकात घेतली जाते. हिंदुस्थानांत उत्पादन झालेल्या साखरेसहि प्रत्येक हंड्रेडवेटास २ रुपये इतकी पट्टी द्यावी लागते.

**सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लि.**

वरील बँकेस १९३७ सालीं ३२½ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड व २ टक्के दरानें बोनस (दोन्ही करमाफ) मिळालें.

**ब्रिटिश विमा कंपनीचें अवाढव्य काम**

"प्रुडेन्शल" ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश विमा कंपनीच्या आयुर्विमा शाखेत गेल्या वर्षी ४२ कोटि रुपयांचे नवे विमे उतरले गेले. ह्याच शाखेचें प्रीमियमचें उत्पन्न ४७ कोटि रुपये झालें!

**मुंबईची औद्योगिक जत्रा**

मुंबईच्या आझाद (एस्प्लेनेड) मैदानावर भरवण्यांत आलेलें चौथें औद्योगिक प्रदर्शन मार्चच्या १९ तारखेस सुरू झालें असून तें येत्या १८ तारखेपर्यंत चालू रहाणार आहे.

**काँग्रेसचें येतें अधिवेशन**

काँग्रेसचें येतें अधिवेशन फेब्रुवारी, १९३९ च्या शेवटच्या आठवड्यांत भरणार आहे.

**हिंदुस्थानांतील गव्हाची लागवड**

चालू सालीं हिंदुस्थानांत ३ कोटि, २४ लक्ष एकर जमिनींत गहूं पेरला आहे, असा सरकारी अजमास आहे. ह्यापैकीं शेकडा ३०½ टक्के लागवड पंजाबांत, २३ टक्के लागवड संयुक्त प्रांतांत, १० टक्के लागवड मध्यप्रांतांत व ६½ टक्के लागवड मुंबई प्रांतांत आहे.

**चित्रपटांच्या सहाय्यानें राजकीय प्रचार**

चीन व जपान ह्यांचेमध्यें सलोख्याचें वातावरण निर्माण करण्यासाठी जपाननें चीन देशांत चित्रपटांचे द्वारां प्रचार चालविला आहे. ह्या फिल्म्समध्यें चिनी कुटुंबांचें जीवन दाखविण्यांत येतें व जपानी अंमलाखालीं त्यांस केवढें मोठें सुख मिळतें, हें त्यांत दिग्दर्शित केलें जातें. नट-नटी चिनी असतात.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | किंमत रुपये |
|---|---|
| २०–३–३८ ते २६–३–३८ | ६०,८०,५८३ |
| २७–३–३८ ते २–४–३८ | २२,९६,१०० |
| २१–९–३१ ते २–४–३८ | ३,१२,७०,६८,०३६ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १५८ |
| २ हिंदुस्थान सरकारचें औद्योगिक धोरण ... | १५९ |
| ३ कारखानदारांचा दृष्टिकोन | १६० |
| ४ स्फुट विचार ... चांदीची चलविचल—कपाशीच्या उत्पादनास द्रव्य-सहाय—चित्रपटाचा स्वदेशी धंदा—अहमदाबादमधील अशुद्ध हवा | १६१ |
| ५ तुर्कस्तानचें अधुनीकरण | १६२ |
| ६ प्रेसिडेन्सी इं. बँक लि. | १६३ |
| ७ परराष्ट्रीय हुंडीचा व्यवहार ... | १६४ |
| ८ पृथ्वीची गती कमी होत आहे ... | १६४ |
| ९ ऑम्निपोल इंडिया लि. | १६६ |
| १० निवडक बाजारभाव | १६७ |

अर्थ

बुधवार, ता. ६ एप्रिल, १९३८

# हिंदुस्थान सरकारच्या औद्योगिक धोरणाचें सिंहावलोकन

## सर रहिमतुल्ला चिनॉय ह्यांची टीका

हिंदुस्थानांतील व्यापारी संस्थांच्या मध्यवर्ती मंडळाचें (फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ॲन्ड इंडस्ट्री) अकरावें वार्षिक अधिवेशन गेल्या आठवड्यांत दिल्ली येथें भरलें होतें. हिंदी व्यापारी वर्गाचें म्हणणें हिंदुस्थान सरकारच्या कानांवर जवळून पडावें हा हेतु अधिवेशन दिल्ली येथें भरविण्यांत असतो. सरकारच्या व्यापारी व औद्योगिक खात्याचे मंत्रि मागें सदरहु बैठकीस समक्ष हजर राहून चर्चेत भाग घेत असत व सरकारची बाजू पुढें मांडीत असत. युरोपिअन व्यापारी मंडळयांच्या सभांत हा प्रघात चालू आहे. सरकार व हिंदी फेडरेशन ह्यांचेमधील मात्र हें सहकार्य पूर्वीप्रमाणें राहिलेलें नाहीं व त्याकारणानें बैठकीची उपयुक्तता थोडी कमी झाली आहे असें वाटण्यासारखें आहे. तथापि, विशिष्ट परिस्थितींत ही गोष्ट घडून आल्यानें ती गृहीत धरूनच चाललें पाहिजे.

यंदाच्या बैठकीचे अध्यक्ष, सर रहिमतुल्ला चिनॉय, ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थान सरकारच्या गेल्या वर्षाचे अवधीमधील औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांतील कारभाराचें परीक्षण केलें. सरकारच्या सहानुभूतिशून्य धोरणावर त्यांनीं कडक टीका केली व प्रत्येक वेळीं सरकारनें हिंदी हितसंबंधांची हेटाळणी कशी केली, हें तपशीलवार उदाहरणें देऊन दाखवून दिलें. आंतरराष्ट्रीय साखर करारास संमति देण्यापूर्वीं सरकारनें हिंदी कारखानदारांस विश्वासांत घेतलें नाहीं व पांच वर्षांच्या दीर्घ मुदतीच्या करारास स्वतःस बांधून घेऊन देशी साखरेच्या निर्गतीस बंदी करवून घेण्यास तें कारणीभूत झालें. करारावर सही होण्यापूर्वीं, मध्यवर्ती असेंब्लीनें त्यांतील अटींविषयीं आपली नापसंती स्पष्टपणें व्यक्त केली असतांहि, सरकारनें तिचेकडे लक्ष दिलें नाहीं.

हिंदुस्थान व जपान ह्यांमधील व्यापारी करारासंबंधीं उभय सरकारांमध्यें वाटाघाटी चालू होत्या, त्यावेळींहि हिंदुस्थान सरकारनें हिंदी हितसंबंधी वर्गाची अशीच अवहेलना केली. बिनसरकारी सल्लागारांच्या माहितीचा व अनुभवाचा फायदा सरकारनें मिळविला नाहीं व त्यामुळें कापड कारखानदार आणि कपास पेरणारे शेतकरी ह्यांच्या अडचणींचें प्रत्यक्ष ज्ञान सरकारास होऊं शकलें नाहीं. देशांतील अल्प प्रमाणावरील उद्योगधंद्यांची जपानी स्पर्धेमुळें गळचेपी होत आहे, हें प्रस्तुत वाटाघाटींत सरकारच्या दृष्टोत्पत्तीस आलें, तरी ह्या धंद्यांस संरक्षण मिळालें नाहीं. एका अधिकाऱ्याकडे ह्या प्रश्नाची चौकशी सोपवून सरकारनें वेळ मारून नेली, परंतु चौकशीचें काम पूर्ण होण्यापूर्वींच त तहकूब करून टाकलें. जपान युद्धांत गुंतलें असल्यानें त्या देशाच्या मालाची स्पर्धा हिंदी मालास आतां भोवणार नाहीं, एवढें कारण सरकारास पुरलें! हिंदी उद्योगधंद्यांचे बाबतींत तटस्थपणा स्वीकारण्याचें हें धोरण जनतेस मान्य नाहीं, हें उघड आहे.

हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन ह्यांचेमधील व्यापारी वाटाघाटींस प्रदीर्घ काळ लागत आहे, त्यांत कांहीं तरी गोम असल्याची शंका सर राहिमतुल्ला ह्यांस येत आहे. ग्रेटब्रिटननें आजवर अनेक देशांशीं व्यापारी करार केले, त्यांच्या पूर्वतयारीस इतका वेळ लागल्याचें कोठें आढळत नाहीं. हीं बोलणीं थबकली आहेत कोठें, ह्याचा व्यापारी वर्गास कांहींच माहिती नाहीं. ग्रेटब्रिटन हिंदुस्थानाकडून कांहीं विशेष सवलती मागत आहे असा लोकांमध्यें बोभाटा झाला असल्यास नवल नाहीं, असें ते म्हणाले. ओटावा करार मध्यवर्ती असेंब्लीनें फेटाळून लावला असला तरी नवीन करार होईपर्यंत जुन्या करारांतील अटींप्रमाणेंच हिंद-ब्रिटन व्यापार चालू रहाणार आहे. म्हणजे, नवीन करार लांबणीवर पडण्यांत ग्रेटब्रिटनचें कांहींच नुकसान नाहीं. हिंदुस्थानास अमान्य असलेल्या ब्रिटिश मालास दिलेल्या सवलती कायम रहाव्यात, असा परिणाम ह्या दिरंगाईचा होत असून तो ब्रिटिश सरकारास अभिप्रेत असावा अशी शंका येते.

हिंदी लष्करांतील ब्रिटिश सेनेचें अधुनीकरण करण्याचे ब्रिटिश सरकारनें ठरविलें, त्यास विधिमंडळाची संमति घेण्यांत आली होती काय? त्याचप्रमाणें, हिंदुस्थानाच्या बंदरांचें संरक्षणासाठी नाविक दल जय्यत ठेवण्याची जबाबदारी त्यांनीं ह्या देशावर टाकली, ह्याचा अर्थ हिंदी किनाऱ्याचें संरक्षण करण्यास ब्रिटिश सरकार बांधलेलें नाहीं, असा करावयाचा कीं काय? हा मुद्दा सर रहिमतुल्ला ह्यांनीं आपल्या भाषणांत पुढें मांडला. एवढ्या मोठ्या महत्त्वाच्या प्रश्नांचा निकाल एकतर्फीपणानें लावण्यांत आला असून ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान ह्यांच्या परस्पर सबंधांतील दूरगामी स्वरूपाच्या घडामोडी हिंदी विधिमंडळाच्या अपरोक्ष चालाव्या ह्याबद्दल त्यांनीं तीव्र नापसंती व्यक्त केली.

हिंदी जनतेची क्रयशक्ति वाढण्याच्या आवश्यकतेविषयींचा सर रहिमतुल्ला ह्यांच्या मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे. आज अनेक वर्षे ह्यासंबंधीं चर्चा चालू असून, हिंदुस्थानची वाढती लोकसंख्या व जनतेच्या रहाणीचें हीन मान हीं लक्षांत घेतां, फाजील उत्पादनास येथें जागाच नाहीं असें मत व्यक्त करण्यांत आलेलें आहे. तथापि उपलब्ध मालाचा विनिमय विनामूल्य होऊं शकत नाहीं; उपभोक्त्यांस त्याकरितां मूल्य द्यावें लागतें. ह्या कारणानें हिंदी प्रजेची आर्थिक परिस्थिति सुधारल्याखेरीज उद्योगधंद्यांची वाढ झपाट्यानें होणार नाहीं, हें उघड आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीचा प्रश्न स्वायत्त प्रांतिक सरकारांनीं हातीं घेतला असून, त्यांच्या स्थितीच्या सुधारणेकरितां उपाययोजना आखण्यांत येत आहेत. तथापि जोंपर्यंत शेतकऱ्यांच्या उत्पन्नांतून त्यांचा वार्षिक खर्च भागूं शकत नाहीं व रोजच्या मीठ-भाकरीकरितां त्यांस कर्ज काढावें लागत आहे, तोंपर्यंत कर्ज-निवारण व तत्सम योजना ह्यांचा फारसा उपयोग होणार नाहीं, असें सर रहिमतुल्ला म्हणाले. शेतीचा धंदा किफायतशीर कसा करतां येईल, हा प्रश्न अत्यंत अवघड आहे. प्रांतिक सरकारांच्या प्रयत्नांस मध्यवर्ती सरकारनें सहाय केल्यास त्याचा बिकटपणा कमी होईल, हें उघड आहे.

## कारखानदारांचा दृष्टिकोन

कामकरी वर्गाच्या हिताचें संरक्षण करण्यासाठीं ज्याप्रमाणें मजूरसंघ स्थापन होऊन त्यांचें अखिल-भारतीय संघटन झालें आहे, त्याप्रमाणें ह्या संघाच्या मागण्यांस तोंड देण्याच्या हेतूनें कारखानदारांनीहि आपलें एक मंडळ स्थापन केलें आहे. कारखानदारांची बाजू देशापुढें मांडून त्यांच्या हितसंबंधांस ज्या हानिकारक होण्याचा संभव आहे अशा योजना आणि विचार ह्यांचा प्रतिकार करणें हें त्याचें उद्दिष्ट आहे. ह्या मंडळाच्या पांचव्या वार्षिक सभेंत त्याचे अध्यक्ष, श्री. घनश्याम बिर्ला, ह्यांचें दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत भाषण झालें तें विचारप्रवर्तक असल्यानें त्याचा परामर्श येथें थोडक्यांत घेणें आवश्यक आहे. औद्योगिक संरक्षण, बाजारभाव, चलनपद्धति, करांचा बोजा, इत्यादि विषय कारखानदारांच्या हितसंबंधाच्या कक्षेंत येत असले तरी त्यांची चर्चा व्यापारी मंडळांच्या मध्यवर्ती संस्थेमार्फत होत असल्यानें त्यांच्या स्वतंत्र मंडळाच्या क्षेत्रांत मजुरीचे दर आणि कामगारांच्या इतर बाबतींतल्या मागण्या ह्याच बाबी प्रामुख्यानें येतात. श्री. बिर्ला शेटजींच्या उपरिनिर्दिष्ट भाषणाचा सर्व रोख ह्या विषयाच्याच चर्चेकडे होता.

उद्योगधंद्यांसंबंधाच्या प्रश्नांत कारखानदार व कामगार ह्यांच्या इतकेंच, कर देणारे व माल विकत घेणारे देशांतील बहुसंख्य लोक ह्यांचें हितानहित गुंतलेलें असतें. कारखानदार केवळ परोपकार म्हणून आपले धंदे चालवीत नाहींत. कामगारहि आपलें पोट भरण्यासाठी कारखान्यांत कामावर जातात. सरकारास कर देणारे वर्ग आणि माल विकत घेणारी जनता उद्योगधंद्यांच्या प्रगतीसाठी थोडीफार झीज सोसते याचें कारण लोकांस उद्योग मिळून त्यांच्या म्हणजे पर्यायानें स्वतःच्या पोटापाण्याची नीट व्यवस्था व्हावी हेंच असतें. देशांत उद्योगधंदे व व्यापार चांगला चालेल तरच सरकारासहि करांचें पुरेसें उत्पन्न मिळण्याची व आपलें विशिष्ट कर्तव्य करण्याची आशा आहे. ह्या रीतीनें एकूण समाजाच्या दृष्टीनें पहातां कोणत्याच एका वर्गाच्या हिताकडे एकांगी लक्ष देऊन चालणार नाहीं. राष्ट्रांतील सर्व घटकांस संपत्तीच्या वांटणींत न्यायानें योग्य अंश मिळाला पाहिजे. ह्यासाठी कायदे करणाऱ्या राजकीय सत्तेनें औद्योगिक घटनेचा विचार व्यापक बुद्धीनें व समतोल मनानें करणें अगत्याचें असतें. कोणत्याहि एका सामाजिक गटाचें प्राबल्य झालें किंवा स्तोम माजलें तर इतरांची व सर्व राष्ट्राची हानि होण्याची भीति असते. कामगार वर्गाची प्राप्ती व क्रयशक्ति अल्प असेल तर मालाचा उठाव होत नाहीं आणि त्याच्या किंमती पडून कारखान्यांस सुस्थिति लाभणार नाहीं. माल महाग झाला असतां मजुरीचे दर वाढल्यानें होणारा फायदा समाजाच्या पदरांत न पडतां तोच प्रतिकूल परिणाम घडून येणार. खर्च परवडत नाहीं म्हणून किंवा नफा होत नाहीं म्हणून कारखाने चालले नाहींत तर भांडवलवाले व मजूर दोघेहि बुडणार आणि एकंदर समजाचें अनहित होणार. अशा रीतीनें हा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा असून मजुरीचे आणि डिव्हिडंडचे दर, औद्योगिक संरक्षण आणि मालाच्या किंमती ह्यांविषयींचा निर्णय आकडे वरवर पाहून सहज करतां येत नाहीं. मजूरीचे दर वाढावे व कामाचे तास कमी व्हावे अशी कामकरी वर्गाची इच्छा असणें स्वाभाविक आहे. आपले धंदे फायद्यांत चालावे असें कारखानदारांस वाटणेंहि साहजिक आहे. त्याचबरोबर, सामान्य जनतेनें धारण स्वस्त असावी आणि सरकारानें आपणांस करांचें वाढतें उत्पन्न मिळावें असें कां म्हणूं नये? सकृद्दर्शनीं परस्पर-विरुद्ध दिसणाऱ्या ह्या इच्छांचा मेळ घालण्यांतच खरें सामाजिक चातुर्य आहे. कारण, त्यांचें अंतिम हित परस्परावलंबी आहे.

बिर्ला शेटजींनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं, हिंदुस्थानांत खेडेगांवांच्या मानानें शहरांत मजूरीचे दर किती तरी पटीनें जास्त असल्यानें कामकऱ्यांची वाढती संख्या मोठ्या शहरीं कारखान्यांकडे आकर्षली जाते आणि मागणीच्या मानानें त्यांचा पुरवठा अधिक झाल्याकारणानें तेथें मजूरीचे दर सहाजिकच उतरतात. परंतु सरकार मध्यें पडून हे दर उचलून धरूं लागतें तेव्हां कारखानदारांस उत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठी सुधारलेलीं यंत्रें आणणें प्राप्त होतें आणि त्याचा परिणाम कामगारांची संख्या कमी होण्यांत घडून येतो. महाग माणसांच्या ऐवजी कार्यक्षम यंत्रें उपयोगांत आणण्यावांचून कारखानदारांस गत्यंतर रहात नाहीं आणि त्या योगानें बेकारी वाढते. बेताची मजूरी पण पुरेसें काम पत्करता का ज्यास्त मजूरी आणि वाढती बेकारी हवी? असा पेच श्री. बिर्ला ह्यांच्या विचारसरणीनें घातला आहे. त्यांच्या युक्तिवादांत तथ्य आहे. परंतु त्याच्या साखळीचा एक दुवा तुटलेला आहे. मजूरी वाढली असतां, तिची भरपाई होण्यास उत्पादनखर्चामध्यें काटकसर होण्यास जागा नाहीं आणि कारखानदार व भांडवलवाले ह्यांस होणाऱ्या नफ्यांत कूस नाहीं असें त्यांनीं गृहीत धरलें आहे. पण ह्या गृहीत गोष्टी अगोदर पुराव्यानिशीं सिद्ध झाल्या पाहिजेत. कारखान्यांस लागणारें भांडवल आकर्षून घेतलें जाईल इतक्या बेतानें धंदेवाल्यांस नफा झाला पाहिजे ह्यांत शंका नाहीं. मजूरी अवाच्या सवा वाढून तिचा बोजा उद्योग-धंद्यांस व जनतेस असह्य झाला तर त्यांत सर्व समाजाचें नुकसान आहे. मजूरीच्या दरांबाबत चौकशी करण्यासाठी प्रांतिक सरकारांनीं कमिट्या नेमल्या आहेत, त्यांची उपयुक्तता श्री. बिर्ला ह्यांनीं मान्य केली असून कामकरी वर्गाचें खरें खुरें हित पहाणारे मंजूरसंघ स्थापन होण्याची आवश्यकताहि त्यांनीं प्रतिपादली आहे, हें चांगलें आहे. मुंबईच्या सरकारनें ह्या संबंधांत कमिटी नेमली आहे, तिचा उद्देश, मजूरीचे दर कारखान्यांच्या आर्थिक परिस्थितीस अनुलक्षूनच निश्चित करणें हा असल्यानें बिर्ला शेटजींच्या विचारसरणीस धरूनच तो उपक्रम आहे, असें म्हटलें पाहिजे. कारखानदार आणि कामकरी ह्यांच्या मधल्या तंट्यांचा निकाल सरकारनें बहुजन समाजाचे प्रतिनिधी आणि त्याच्या हिताचे रक्षणकर्ते ह्या नात्यानेंच केला पाहिजे. मजूरांच्या मागण्या किंवा कारखानदारांचा आग्रह ह्यांस सामान्य जनता बळी दिली जातां कामा नये. जनता, कामकरी व कारखानदार ह्या त्रिवर्गास परवडेल अशा बेतानें त्यांमध्यें मिळकतीची वांटणी झाली पाहिजे आणि ह्या विषयींचा निर्णय सरकारमार्फत निःपक्षपाती तज्ज्ञांच्या सहायानें होणें आवश्यक आहे. श्री. बिर्ला ह्यांनीं कारखानदारांची बाजू पुढें मांडतांना कित्येक भांडवलवाल्यांच्या पद्धतीप्रमाणें आत्यंतिक एकांगीपणा न दाखवतां व्यापक विचारसरणीचा आश्रय केला आहे हें अभिनंदनीय आहे.

---

# स्फुट विचार

### चांदीची चलविचल

मेक्सिकोमध्यें राकेल तेलाच्या विहिरी आहेत, त्यांच्या मालकी हक्काविषयींचें तेथील सरकाराचें धोरण अरेरावीचें झालें आहे अशी तक्रार करण्यास परराष्ट्रीय भांडवलवाल्यांस त्यानें जागा दिली आहे. मेक्सिकन तेलाचा धंदा अमेरिकेनांच्या हातांत असून तद्देशीय सरकारच्या नवीन धोरणानें त्यांच्या हक्कांवर गदा आणली आहे. अशा स्थितींत अमेरिकन सरकारकडून मेक्सिकोंत निघणाऱ्या चांदीच्या विक्रीबाबत देण्यांत येणाऱ्या सवलती काढून घेण्यांत याव्या हें स्वाभाविक आहे. पुरवठ्याच्या मानानें चांदीस जगांत मागणी नाहीं, ह्या कारणानें तिचे बाजारभाव अमेरिकन सरकारच्या खरेदीवर सर्वस्वी अवलंबून आहेत. विशिष्ट किंमत देऊन विक्रीस येणारी चांदी सरकारनें विकत घ्यावी असा अमेरिकेंत कायदा आहे आणि त्यास अनुसरून, मेक्सिकन खाणींतून निघणाऱ्या चांदीची खरेदी तेथें केली जात आहे. मेक्सिकोंत चांदीच्या खाणींचा धंदा मोठ्या प्रमाणांत चालतो आणि त्याचें अमेरिकन गिऱ्हाइक बंद झाल्यास चांदीचे भाव उतरणार आणि मेक्सिकोचें नुकसान होणार हें उघड आहे. अमेरिकेनें चांदीच्या खरेदीची ठरलेली किंमत कमी केली आणि तो माल मेक्सिकोकडून घ्यावयाचा नाहीं असें ठरवलें म्हणजे चांदीची जागतिक किंमत उतरणें अपरिहार्य आहे. असा परिणाम लंडनच्या चांदी बाजारावर आणि त्याच बरोबर मुंबईतल्या बाजारावरहि झाला आहे. हे बाजार परस्परावलंबी आहेत आणि एकांत होणारा चढउतार तात्काळ दुसऱ्यांत जाणवतो, असा नेहमीचा अनुभव आहे. ह्याप्रमाणें गेल्या आठवड्यांत लंडन, मॉंट्रील, न्यूयॉर्क व मुंबई येथील बाजारांत चांदी पडली. दर शंभर तोळ्यांस दोन आठवड्यांमागें ५२ रुपयांच्या सुमारांत भाव होता, तो ४८ रुपयांच्याहि खाली कांहीं वेळ जाऊन ४९ रुपयांच्या आसपास राहिला. चांदीच्या किंमतीचें भवितव्य अमेरिकेच्या धोरणावर व ठराविक किंमतीवर अवलंबून रहाणार. मेक्सिकोची चांदी अमेरिकेंत सरळ न जातां लंडन येथील बाजाराच्या आडमार्गानें जाईल त्यावर अमेरिकन सरकार काय इलाज करतें हें निश्चित नाहीं. त्याचप्रमाणें, मेक्सिकोचें नाक दाबून तोंड उघडण्याचा प्रयत्न केल्यावांचून तें रहाणार नाहीं, त्याचेंहि काय होतें, हेंहि सांगतां येत नाहीं.

---

### ऑस्ट्रेलियांत कपाशीच्या उत्पादनास सरकारचें द्रव्यसहाय

सरकारच्या सहायानें कच्च्या मालाच्या आणि विशेषत: शेतीच्या पिकांच्या उत्पादनास उत्तेजन देण्याची प्रवृत्ति अनेक देशांमध्यें बळावत आहे. ह्याचें ताजें उदाहरण, ऑस्ट्रेलियांत कपाशीच्या पिकास तेथील सरकार मदत करीत आहे, ह्याचें देतां येईल. पैशाच्या तंगीमुळें मध्यंतरीं ही मदत कमी करण्यांत आली होती ती आतां पूर्वीच्या दरानें शेतकऱ्यांस देण्याचा ऑस्ट्रेलियन सरकारचा विचार आहे. ऑस्ट्रेलियांतील सुताच्या कारखान्यांस लागणारा कापूस तद्देशीय शेतकऱ्यांनीं पिकवावा म्हणजे त्याच्या पुरवठ्याबाबतचें परावलंबन नाहींसें होईल ही मूळची कल्पना होती. परंतु कपाशीचे बाजारभाव उतरल्यामुळें तिचें पीक काढणें शेतकऱ्यांस परवडेनासें झालें आणि म्हणून विशिष्ट मर्यादेंत, कपाशीच्या दर पौंडास, उत्पादनास ठरलेल्या कोष्टकाप्रमाणें राष्ट्रीय तिजोरींतून द्रव्यसहाय देण्याचें ऑस्ट्रेलियन सरकारनें निश्चित केलें आहे. ज्यांस परिस्थिति विशेष अनुकूल असेल तेच धंदे प्रत्येक देशांत केले जावे आणि कृत्रिम रीतीनें भलत्याच धंद्यांच्या भानगडींत लोकांनीं व राज्यकर्त्यांनीं शिरूं नये, ह्या परंपरागत तत्त्वाची काय वाट? हा प्रश्न येथें उपस्थित झाल्यावांचून रहात नाहीं.

---

### चित्रपटाचा स्वदेशी धंदा

कोणत्याहि ब्रिटिश सिनेमागृहांत दाखवण्यांत येणाऱ्या चित्रपटांत स्वदेशी ब्रिटिश पटांचें विशिष्ट प्रमाण असलेंच पाहिजे असा निर्बंध ग्रेटब्रिटनमध्यें घालण्यांत आलेला आहे. पण ब्रिटिश बनावटीच्या चित्रपटांचें हें कायदेशीर प्रमाण भरून काढण्यासाठी कमी दर्जाच्या पटांची संख्या वाढवण्याची प्रवृत्ति धंदेवाल्यांमध्यें दिसून आल्यानें तिला आळा घालण्याचा प्रयत्न नवीन होणाऱ्या कायद्यानें केला जात आहे. हलक्या दर्जाचे चित्रपट घाईनें काढले जाऊं नयेत म्हणून त्यांवर होणाऱ्या खर्चाची किमान मर्यादा ठरवण्यांत यावयाची आहे. ब्रिटिश म्हणून दाखवावयाच्या बोलपटांच्या यादींत समाविष्ट होण्याची पात्रता, निदान एक लक्ष रुपये ज्याच्या बनावटीवर खर्च झाले असतील अशाच चित्रपटांत आहे, असें समजलें जाईल. हॉलिवुडच्या बनावटीच्या दर्जाचे चित्रपट ग्रेटब्रिटनमध्यें निर्माण व्हावे हा सद्हेतु नियमाचा उद्देश आहे. मागें नेमलेल्या एका कमिटीची अशी सूचना होती कीं ब्रिटिश चित्रपटांच्या धंद्याची प्रगति घडवून आणण्यासाठीं त्याच्या मार्गदर्शनार्थ एक स्वतंत्र मंडळ स्थापण्यांत यावें. परंतु ही सूचना सिनेमाचा धंदा करणाऱ्या लोकांस मान्य नाहीं आणि तिचा अंतर्भाव नवीन व्हावयाच्या कायद्याच्या मसुद्यांत नाहीं. चित्रपटांच्यासारख्या महत्वाच्या स्वदेशी धंद्याच्या स्वास्थ्याकडे ब्रिटिश सरकार व कायदेमंडळ ह्यांचें किती लक्ष आहे, हें मात्र प्रस्तुत विषयाच्या संबंधांत ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

---

### अहमदाबादमधील अशुद्ध हवा

कापडाच्या गिरण्यांच्या चिमण्यांतून बाहेर पडणाऱ्या धुरामुळें अहमदाबाद शहरांतील हवा दूषित होते व त्या कारणानें फुफ्फुसाचे, घशाचे, नाकाचे व डोळ्याचे रोग बळावतात, असा अनुभव आहे. गिरण्यांत जळणाऱ्या १,१०० टन कोळशापैकीं १५० टन कोळसा नीट जळत नाहीं व त्याचे कण हवेंत मिसळतात. मुंबई शहरांतील हवेचे मानानें अहमदाबादेंतील हवा सकाळचे वेळीं चिमण्यांतील धुरामुळें ४½ पटीनें दूषित असते. तेथील प्रत्येक गिरणीच्या चिमणींतून बाहेर पडणाऱ्या धुरावर लक्ष ठेवून, वाजवीपेक्षा जास्त धूर सोडणाऱ्या चिमणीवाल्या गिरणीस इशारत देण्यासाठीं एक उंच टॉवर बांधण्याचें घाटत आहे. सूचना न मानणाऱ्या गिरणीवर कायदेशीर इलाज करण्याचा अधिकार म्युनिसिपालिटीस मिळावा, अशी खटपट चालू आहे.

---

### दक्षिण अमेरिकेंतील लोकांस आकर्षण्याची चढाओढ

दक्षिण अमेरिका खंडांतील देशांस स्वस्थ बसूं न देण्याचा युरोपियन राष्ट्रांचा बेत दिसतो. जर्मनी व इटली ह्या राष्ट्रांमार्फत प्रचारात्मक भाषणें रेडिओंतून ब्रॉडकास्ट केलीं जातात व त्यांत स्पॅनिश व पोर्तुगीज भाषांचा उपयोग केला जातो. दक्षिण अमेरिकेंतील देशांकरितां ही खास व्यवस्था आहे. ग्रेट ब्रिटननेंहि हा उपक्रम केला आहे. अमेरिकेच्या सरकारनें ह्या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार करण्याचें ठरविलें आहे व स्वत: स्पॅनिश व पोर्तुगीज भाषांतून रेडिओ कार्यक्रम ठेवण्यास प्रारंभ केला आहे.

---

## तुर्कस्तानचें अधुनीकरण

### राष्ट्रीय भावनेचा उत्कर्ष


एका काळीं युरोपांत तुर्की राष्ट्र हें आंतून पोखरलेलें व वठत चाललेलें जुनें झाड असें समजण्यांत येत असे. तुर्की संस्कृति जुन्या वळणाची आणि राज्यव्यवस्था बदलत्या काळाशी विसंगत असल्यानें तुर्कस्तान नष्ट होण्याच्या पंथास लागलें आहे अशी सार्वत्रिक समजूत होती. चालू शतकाच्या प्रारंभीं ह्या परिस्थितींत सुधारणा होण्याचा रंग दिसूं लागला. तथापि, तुर्कस्तानांत राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक मनू पालटला तो महायुद्धानंतर आणि ह्या मन्वंतराचा कर्ता केमालपाशा होय. जुन्या कल्पना, चालीरीती आणि परंपरागत राजकीय व सामाजिक व्यवस्था ह्यांमध्यें संपूर्ण क्रांति घडून आल्यावांचून आंतरराष्ट्रीय जीवन-कलहांत तुर्कस्तान तगूं शकत नाहीं, ह्याची खात्री होऊन केमालनें आपल्या राष्ट्राच्या एकीकरणास व अधुनीकरणास हात घातला. खिलफतीचें धार्मिक वर्चस्व नाहींसें करणें, तुर्की संस्कृतीचें वर्धन करणें आणि राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक जीवनास राज्यकर्त्यांनीं योग्य वळण लावणें ह्या त्रिविध कार्यक्रमास त्यानें प्रारंभ केला. १९२३ ते १९३३ ह्या दहा वर्षांच्या अवधींत तुर्की स्वदेशी उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांस उत्तेजन देऊन त्यांचा उत्कर्ष घडवून आणण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. १९३४ सालीं आर्थिक संवर्धनाची पंचवार्षिक योजना चालू झाली आणि ती गेल्या वर्षी पुरी होऊन तशीच दुसरी योजना आतां सुरू करण्यांत आली आहे. लहान-मोठे धंदे, व्यापार, शेती, जंगलें, रेलवेज, बंदरें ह्यांच्या व्यवस्थित प्रगतीचा अंतर्भाव ह्या योजनेंत झालेला आहे.

### उद्योगधंद्यांची वाढ

तुर्की योजनात्मक आर्थिक उन्नतीच्या मुळाशीं एकराष्ट्रीयत्वाची प्रबळ भावना आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. राष्ट्रीय जीवनाच्या आर्थिक बाजूचें पद्धतशीर संवर्धन करणें हें आधुनिक तुर्कस्तानच्या राज्यकर्त्यांचें धोरण आहे. आपल्या लोकांच्या विशिष्ट गरजा भागण्यासाठीं त्यांस उपलब्ध असलेल्या स्थानिक साधनांच्या सहायानें उद्योगधंदे व व्यापार ह्यांची योजनात्मक घटना व प्रगति करावयाची हें तत्त्व त्याच्या मुळाशीं आहे. तुर्कस्तानांत साखरेचें उत्पादन इतकें वाढलें आहे कीं परदेशांतून ती आणण्याची आवश्यकता आतां उरलेली नाहीं. सिमेंट व दगडी कोळसा ह्यांच्या उत्पादनाचाहि विस्तार झालेला आहे. पंचवार्षिक योजनेस अनुसरून कपास, लोकर, कृत्रिम रेशीम, कागद, कांच इत्यादि धंदे हातीं घेण्यांत आले आणि लोखंड, पोलाद व रासायनिक द्रव्यें ह्यांच्या धंद्यांची मुहूर्तमेढ रोवण्यांत आली. ह्या कार्यासाठीं चार-साडेचार कोटि तुर्की पौंड इतकें भांडवल सरकारनें पुरवलें. जुन्या कापूस कारखान्यांची पुनर्घटना करण्यांत येऊन नवीनांची स्थापनाहि केली गेली. ही योजना पुरी होईल तेव्हां तुर्कस्तानचें कापडाचें उत्पादन इतकें वाढेल कीं लोकांच्या एकूण मागणीपैकीं ८५ टक्के इतका माल देशांतल्या देशांत पुरवतां येईल. ह्या वाढीस लागणारी यंत्रसामुग्री रशियानें व जर्मनीनें पुरवली आहे आणि तिचे पैसे हप्त्यांनीं फेडावयाचे आहेत. लोकरीच्या कापडाची पैदास पुरेशा प्रमाणांत होण्यासाठीं परदेशांमधून मेंढ्या आणवल्या असून त्यांपासून निघणारी लोकर कारखान्यांस पुरेल अशी अपेक्षा आहे. कृत्रिम रेशमाचा धंदाहि सरकारनें हातीं घेतला आहे. ह्या रीतीनें राष्ट्रीय भावनेच्या पायावर आर्थिक उन्नतीची इमारत तुर्की राज्यकर्ते उभारीत आहेत.

---

गव्हाचे पोहे
(REGD.) ( BLOSSOM ) (REGD.)
कित्येकांना गहूं खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.
ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दुधा-दुधांतून खातां येतात.
७५३ सदाशिव, पुणें २.
भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.



टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
MARATHI KENDRA : 292 Sadashio Peth POONA

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—
भाऊ गंगाधर साठे, कॅन्ट्राक्टर
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत
डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.
जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

### दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक, लि. पुणें

वरील बँकेची साधारण सभा रविवार तारीख २७-३-१९३८ रोजीं भरली होती.

बँकेचें अधिकृत भांडवल १० लाख रुपये आहे व तें दहा हजार भागांत विभागलेलें आहे. प्रत्येक भागाची किंमत शंभर रुपये आहे. कंपनीनें विक्रीकरतां पांच हजार भाग काढले असून अर्जासोबत पंधरा रुपये व अर्जमंजुरीनंतर दहा रुपये असा भरणा करावा लागतो. रिपोर्टाचे वर्षअखेर ११८१ भाग ( दर्शनी किंमत रुपये १,१८,१०० चे ) खपले असून जमा भांडवल रुपये २७,९९५ झालें आहे. बँकेकडे चालू, सेव्हिंग्ज व कायम ठेवी अदमासें रुपये १,२०,००० पर्यंत गेल्या असून चालू व सेव्हिंग्ज खात्यांचा आंकडा ३५० पर्यंत गेला आहे. बँकेनें उद्योगधंद्यास मदत करण्याच्या उद्देशानें व्यापारी वर्गास रुपये ७०,०० कर्जाऊ दिले आहेत. नफातोटापत्रकावरून पाहतां बँकेनें खर्च कमी करण्याकडे बरेंच लक्ष दिलें आहे. खर्चाचें प्रमाण अत्यंत कमी आहे. बँकेस मिळालेला ९-१० महिन्यांचा अवधि लक्षांत घेतां, बँकेची प्रगति झपाट्यानें होत असून बँकेस झालेला रुपये १५०-७-१ चा तोटा क्षुल्लक आहे.

बँकेच्या स्थापनेचा हेतु, कारखान्यास लागणारें भांडवल लांब मुदतीनें पुरवावयाचें, हा आहे. देशांतील उद्योगधंदे वाढल्याविना देशाची आर्थिक परिस्थिती सुधारत नाहीं, ही गोष्ट मान्य आहे. परंतु पुष्कळसे धंदे भांडवलाच्या अभावीं उर्जितावस्थेस येत नाहींत, ही गोष्ट तितकीच खरी आहे. हिंदुस्थानचें पाऊल हळु हळु पुढें पडत आहे, अशा वेळीं उद्योगधंद्यांच्या गरजांकडे लक्ष पुरवून त्यांच्या गरजा भागविणारी बँक असणें हें सुचिन्ह होय.

THE HOUSE OF MODERN STYLE SUITS.

THE DECCAN TAILORING FIRM, *DECCAN GYMKHANA, POONA 4.*

TAILORS & CLOTH MERCHANTS

——*A FRESH STOCK OF NEW DESIGNS*——

WOOLEN, COTTEN AND SILK SUITINGS, SHIRTINGS AND TROUSER FLANELS.

LONDON TRAINED CUTTER.

*MANAGER*—M. N. PATASKAR,
*F. C. D. ( London ).*

अप-टु-डेट शिलाई करतां

माहिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर

३० एप्रिल १९३८ अखेर होणाऱ्या तृतीय त्रैवार्षिक मूल्यमापनापूर्वी आपला विमा उतरवून नवीन कॉनसमध्यें भागीदार व्हा.

२० व्या शतकांत विमा उतरणें ही अत्यंत आवश्यक व महत्त्वाची गोष्ट आहे. एकदां विमा उतरण्याचें ठरल्यावर तो "कॉमनवेल्थ" सारख्या राष्ट्रीय व प्रगतिप्रिय संस्थेंत उतरणें श्रेयस्कर आहे.

अधिक माहितीकरितां लिहा :

दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कं. लि०
पुणें २.

शाखा: मुंबई, मद्रास, अहमदाबाद, कलकत्ता, दिल्ली.

"अर्थ" ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तनेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

कि. १ रु. ( ट. ख. निराळा )

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

## परराष्ट्रीय हुंडीचा व्यवहार ( फॉरिन एक्सचेंज )

( २ )

### प्रो. काळे ह्यांचें दुसरें व्याख्यान

इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या पुणें येथील शाखेच्या विद्यमानें प्रो. काळे ह्यांनीं वरील विषयावर दिलेल्या दुसऱ्या व्याख्यानाचा गोषवारा खाली दिला आहे:—

( १ ) बाहेर पाठविलेल्या मालाबद्दल व्यापाऱ्यानें काढलेली हुंडी म्हणजे त्याच्या परकीय गिऱ्हाइकाकडून मिळावयाच्या पैशावरील हक्क होय आणि तो विकत घेऊन आपल्या परकीय धनकोचें ऋण फेडण्याचें, त्याकडून माल आयात करणाऱ्या एतद्देशीय व्यापाऱ्यास उत्कृष्ट साधन लाभतें. हुंड्या विकून पैसे वसूल करणारे व ह्या विकत घेऊन आपलें परराष्ट्रीय देणें फेडणारे अशा लोकांच्या पुरवठा-मागणीचा मेळ घालणारे धंदेवाले विशिष्ट रीतीनें तो व्यवहार करणारे बँकर्स होत. एक्सचेंज बँकांचा हा खास धंदा होऊन बसला आहे.

( २ ) परराष्ट्रीय हुंड्यांचा स्वतंत्र बाजार ह्याप्रमाणें निर्माण होतो आणि त्यांत ह्या हुंड्यांच्या किंमती ठरतात. हुंडणावळीचा दर निश्चित होतो, तो ह्या मागणी-पुरवठ्याच्या घासाघिशींत होतो.

( ३ ) फॉरिन एक्सचेंजचा दर ठरतो, त्यास मामुली चलनाच्या व हुंडणावळीच्या पद्धतींत निश्चित मर्यादा असतात. त्या लक्षांत येण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चलन पद्धतीची समजूत पटणें आवश्यक आहे. हुंडी विकणारा वस्तुतः परराष्ट्रीय चलनांतील विशिष्ट रकमेवरील आपला हक्क विकतो. म्हणजे स्वदेशांतील चलन घेऊन परराष्ट्रीय चलन तो देतो. ह्या रीतीनें परराष्ट्रीय हुंडणावळ म्हणजे एका देशांतील चलनाचा दुसऱ्या देशांतील चलनाशी विनिमय होय. दोन निरनिराळ्या चलनांची ती अदलाबदल आहे.

( ४ ) एका देशांतील कायदेशीर प्रचलित चलनाच्या दुसऱ्या देशांतील तसल्याच चलनाच्या रकमेशी परस्पर संबंध हीच परराष्ट्रीय हुंडणावळ झाली. विलायतेस एक पौंड पाठवण्यास येथें किती रुपये द्यावे लागतील किंवा एका ब्रिटिश पौंडाचे अमेरिकेंत किती डॉलर मिळतील ह्याचा हिशेब म्हणजेच परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर निश्चित करणें होय.

( ५ ) मामुली चलनपद्धतींचा विचार करतां, जगांतील सर्व प्रमुख राष्ट्रांत कायदेशीररीत्या प्रमुख मूलभूत चलन सोन्याचें केलें आहे किंवा मानलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. विशिष्ट कसाच्या सोन्याचा विशिष्ट वजनाचा-तुकडा हें सर्व किंमती मोजण्याचें माप आहे. त्या तुकड्याच्या किंमतीच्या मानानें सर्व किंमती निश्चित होतात. ब्रिटिश पौंड ११३ ग्रेन वजनाचा आहे आणि हिंदी चांदीचा रुपया सुमारें ७½ ग्रेन वजनाच्या सोन्याबरोबरीचा आहे असें मानल्यास १ पौंड=१५ रुपये असें कोष्टक बसतें. पौंड ( स्टार्लिंग )—डॉलर एक्सचेंज ४.८६ आहे, ह्याचा अर्थ एका पौंडांत जितकें सोनें आहे तितकेंच ४·८६ इतक्या डॉलर्समध्यें आहे असें समजावें. भिन्न भिन्न राष्ट्रांच्या मूलभूत चलनांचें त्यांच्या सोन्याच्या वजनाच्या दृष्टीनें परस्पर-प्रमाण म्हणजेच आंतरराष्ट्रीय हुंडणावळीचे दर होत. ह्या प्रमाणभूत दरांस अनुसरून राष्ट्रीय टांकसाळींत सोन्याची नाणीं पाडून मिळत असल्यानें व चलनाची अदलाबदल होत असल्याकारणानें त्यांस "मिंट पार ऑफ एक्सचेंज" असें म्हणतात. १५ रुपये येथें भरले असतां हिंदुस्थान सरकार त्यांचा मोबदला एक सॉव्हरिन किंवा त्याच्या किंमतीची लंडनवरची हुंडी देत असे ह्याचा उलगडा प्रस्तुत विवेचनावरून होईल.

( ६ ) परंतु त्या ठराविक दरानें हुंड्या विकल्या जात नाहींत किंवा विकत मिळत नाहींत. बाजारांत त्यांचे संबंधांत मागणी पुरवण्याची परिस्थिति वेळोवेळ असते, त्या मानानें त्यांचे दर म्हणजे हुंडणावळीचे दर कमी-ज्यास्त होतात. ह्या दरांस वरची व खालची मर्यादा मात्र असते, तिथें मामुली परिस्थितींत उल्लंघन होत नाहीं.

( ७ ) व्यापाराच्या व्यवहारांत हुंड्यांबाबतच्या मागणी-पुरवठ्याच्या विशिष्ट परिस्थितींत हुंड्या खरेदी करून पाठवण्याऐवजीं सोनें विकत घेऊन तें पाठवणें कमी खर्चाचें होतें तेव्हां त्याच मार्गाचा अवलंब केला जाणें स्वाभाविक आहे. सोनें परदेशी पाठवणें अधिक खर्चाचें असतें आणि तें पाठविण्याच्या दरापेक्षा हुंड्यांचा दर ज्यास्त असणें शक्य नाहीं. म्हणजे परदेशी हुंडीचा भाव सोन्याच्या निर्गतीच्या भावाच्या वर जाऊं शकत नाहीं. ह्या मर्यादेस "गोल्ड एक्स्पोर्ट पॉइंट" म्हणतात. त्याचप्रमाणें, ज्या हुंडीच्या दरानें सोनें आयात करणें परवडतें त्यास "गोल्ड इंपोर्ट पॉइंट" म्हणतात. सामान्य परिस्थितींत ह्या दोन मर्यादांच्या आंत हुंडणावळीचा दर कमी-ज्यास्त होत असतो आणि त्यांत बँकांच्या कमिशनचा अंतर्भाव होतो.

( अपूर्ण )

## पृथ्वीची गती कमी होत आहे

### चंद्राच्या आकर्षणाचा परिणाम

पृथ्वीची गती हळूहळु कमी होत चालली आहे. ती स्वतःभोंवती फिरत फिरत सूर्यप्रदक्षणा करीत असते. तिचा स्वतःभोंवती फिरण्याचा वेग प्रत्येक १०० वर्षांस $\frac{३}{१०००}$ सेकंद, ह्या दरानें मंदावत आहे, असा अजमास डॉ. एच. स्पेन्सर जोन्स ह्यांनीं प्रसिद्ध केला आहे. तिची स्वतःभोंवतीची गती अजिबाद थांबण्यास वरील हिशेबानें ११० अब्ज वर्षें लागतील. तथापि १ अब्ज वर्षांनंतर सूर्यच निस्तेज होईल अशी अपेक्षा आहे.

न्यूटननें स्थापित केलेला गुरुत्वाकर्षणाचा नियम सर्वत्र विश्वास लागू आहे. सूर्याचें घनफळ पृथ्वीच्या घनफळाच्या १३ लक्ष पट आहे व सूर्य पृथ्वीपासून ९ कोटि, ३० लक्ष मैल दूर आहे. चंद्राचें घनफळ पृथ्वीच्या घनफळाच्या एक पंचेचाळिसांशाइतकें आहे, व चंद्र आणि पृथ्वी ह्यांमधील अंतर २¼ लक्ष मैल आहे. सूर्याचा व्यास पृथ्वीच्या १०९ पट आहे. चंद्राचा व्यास पृथ्वीच्या ¼ सुद्धा नाहीं. तथापि, पृथ्वीच्या स्वतःभोंवती फिरण्यावर सूर्यापेक्षां चंद्राच्या सान्निध्याचा जास्त परिणाम होतो. पृथ्वीवरील समुद्राचें पाणी स्वतःकडे ओढण्याचा तो यत्न करतो, व त्यामुळें भरती ओहोटी हीं होतात. पृथ्वीच्या फिरण्याच्या विरुद्ध दिशेनें हें आकर्षण होत असल्यानें त्याचा परिणाम तिच्या गतीवर हळु हळु होत आहे. खुद्द चंद्रहि पृथ्वीचे जवळ येऊं लागला आहे, त्याचाहि पृथ्वीचे गतीवर कांहींतरी परिणाम होईल.

### झारापकर टेलरिंग कॉलेज


हरिजन विद्यार्थ्यास सरकारी शिष्यवृत्ती

येथील सुप्रसिद्ध झारापकर टेलरिंग कॉलेजमध्यें मोफत शिक्षणासाठी दाखल केलेले हरिजन विद्यार्थी श्री. एन. एस. चव्हाण व श्री. रणपिसे यांना मुंबई सरकारच्या बॅकवर्ड क्लास ऑफिसरकडून अनुक्रमें ४५ व ३० रुपयांच्या शिष्यवृत्त्या मिळाल्या आहेत.

# हेच दिवस गोवें बघण्याचे !


## महाराष्ट्रांतील एका अत्यंत रमणीय प्रदेशांत सहल करण्यास चला.

हिंदुस्थानभर पसरलेले कर्तृत्ववान दक्षिणी सारस्वत त्यांची ही धर्मभूमि. त्यांचे पूर्वज इथले. त्यांच्या वसाहतींचो, कलाविकासांची चिरंजीव साक्ष म्हणजे येथील देव व देवळें. रम्य वनश्री, उंच गोपुरें, विस्तृत अग्रशाळा, तलाव इत्यादि वैशिष्ट्यानें अत्यंत प्रेक्षणीय वाटणारीं हीं देवळें अनेक आहेत. मंगेशींचा श्री-मांगिरीश, कवळेंची शांतादुर्गा, रामनाथींचा रामनाथ, नागेशींचा नागेश, बांदिवड्याची महालक्ष्मी, म्हारडोळची म्हाळसा, ह्यां देव-देवता, त्यांचीं देवळें व त्यांच्या आसमंतांतील सृष्टिसौंदर्य नितांत रमणीय आहे.



श्रीमांगिरीश, मंगेश


गोमांतकांत रोमनकॅथॉलिक सांप्रदायी लोकांचीं देवळेंसुद्धां हिंदूंच्या देवळांइतकींच सुंदर व भव्य आहेत. त्यांतल्या त्यांत जुने गोयचीं ख्रिस्ती देवळें—जिथें सेंट फ्रॉन्सीसचें शव आज शेंकडों वर्षें राखून ठेवलें आहे—तीं देवळें फारच दर्शनीय आहेत, प्रत्येकानें तीं पहावींच.



श्रीशांतादुर्गा, कवळें

गोव्यांतील आरोग्यदायी ठिकाणांमध्यें **कळंगुंट** हा गांव फार प्रख्यात आहे. या दिवसांत कळंगुंटच्या विस्तीर्ण समुद्रकांठीं लांबलांबचे लोक समुद्रस्नान व हवा फेर करण्यासाठीं येत असून ते तेथें महिनामहिना राहतही असतात. पणजीपासून अवघ्या दहा मैलांवर हें गांव असून स्टीमलॉंचीस व मोटार मधून तिथें एक तासाच्या आंत पोंचतां येतें.

गोवें पहाण्यास हेच दिवस सोयीचे. या वेळीं गोव्यांत विपुल फळफळावळ-गोव्यांतील प्रख्यात आंबे, फणस, काजू यांची समृद्धी आहे. गोव्याच्या अंतर्भागांत जाण्यासाठीं वहातुकीची सोय सुलभ, बिनत्रासाची व नियमित आहे.



श्रीम्हाळसा, म्हारडोळ

**बी. एस. एन.** च्या बोटींनीं गोव्याला चला. सुखसोयी, वेग व व्यवस्था या बाबतींत बी. एस. एन. च्या बोटी सर्वांत पुढें आहेत. दररोज सकाळीं ९-३० वाजतां आठवड्यांतील सातही दिवस त्या गोव्याला जाण्यासाठीं सुटत असतात.

महाराष्ट्र साहित्य संमेलन प्रसंगीं मुंबईस एकत्रित होणाऱ्या साहित्यभक्तांना गोमांतक पहाण्याची फार नामी संधी आली आहे. ती त्यांनीं दवडूं नये. मुंबईहून गोव्याला पोंचण्यास बी. एस. एन. च्या बोटींना फक्त २० तासांचा अवधी लागत असून तिकिटाचे दर फारच सवलतीचे आहेत. मुंबईस १०० फ्रिअर रोड वरील कंपनीच्या हेड ऑफिसला पत्र लिहिलें अगर फोन [ २५०६१ ] केला असतां प्रवासाबद्दलची अधिक माहिती मिळूं शकेल.

## बी. एस. एन. कंपनी लि.

## हिंदुस्थानांतील शिक्षणाची प्रगति

हिंदुस्थान सरकारनें तयार केलेला १९३५-३६ सालासंबंधींचा हिंदुस्थानांतील शिक्षणविषयक प्रगतीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांतील महत्त्वाचे कांहीं उतारे येथें दिले आहेतः—

( १ ) स्थानिक संस्थांकडून प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था नीट होत नाहीं. साक्षरतेचें प्रमाण अत्यंत मंद गतीनें सुधारत आहे, विश्वविद्यालयांत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणास नालायक आहेत, सुशिक्षितांतील बेकारी देशभर सर्वत्र आढळते व मुलींच्या शिक्षणाची सोय अत्यंत अपुरी आहे.

( २ ) अहवालाचे सालीं शिक्षणसंस्थांची संख्या २ लक्ष, ५६ हजारांची २ लक्ष, ५४ हजार झाली; तथापि दाखल झालेल्या विद्यार्थ्यांत ३ लाखांची भर पडून त्यांची संख्या १ कोटि, ३८ लक्षांवर गेली.

( ३ ) १९३५ सालीं शिक्षणाप्रीत्यर्थ २६½ कोटि रुपये खर्च झाले होते; १९३६ सालीं २७⅓ कोटि रुपये खर्ची पडले. ह्या वाढलेल्या ८० लक्ष रुपये खर्चापैकी मुलींच्या शिक्षणाच्या वांट्यास फक्त ९½ लक्ष रुपये आले.

( ४ ) विश्वविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ७ हजारांनीं वाढून ती १९३६ सालीं १ लक्ष, २४½ हजार इतकी झाली.

( ५ ) प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांपैकीं शेकडा ७३ मुलें साक्षरतेची पायरी गांठत नाहींत. मुलींमध्यें हें प्रमाण शेकडा ८६ इतकें आढळतें.

( ६ ) शहरांतील १६० विभागांत व १०⅓ हजार खेड्यांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें केलेलें आहे. तथापि त्यास अपेक्षित यश आलेलें नाहीं. विद्यार्थी वक्तशीर शाळेंत येत नाहींत अशी तक्रार आहे.

( ७ ) मुलींकरितां चालविलेल्या संस्थांची संख्या ३८,३१० असून त्यांत ३० लक्ष विद्यार्थिनी आहेत. सहशिक्षणास सहानुभूति वाढत आहे. मुलींच्या शिक्षणापेक्षां मुलांच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष पुरविलें जातें. ही परिस्थिति सुधारली पाहिजे.

( ८ ) युरोपियन व अँग्लो-इंडियन शाळांत ६२ हजार मलें होतीं. ह्या संस्थांच्या खर्चांत ४⅓ लक्षांची वाढ झाली.

### ऑम्निपोल ( इंडिया ) लि.

झेकोस्लोव्हाकिया देशांतील स्कोडाचे कारखाने सुप्रसिद्ध आहेत. अनेक देशांतील हुंडणावळीवरील निर्बंधांमुळें त्या कारखान्यांनीं बाहेर पाठविलेल्या मालाचा मोबदला त्यांस रोखींत मिळणें कठीण होऊं लागलें, तेव्हां त्या देशांतून कच्चा माल आयात करून आपलें येणें वसूल करण्यासाठी स्कोडांनीं ' ऑम्निपोल कंपनी ' स्थापन केली. ह्या कंपनीनें आणवलेल्या मालास गिऱ्हाइक मिळवून देण्याकरितां पुढें इतर देशांतील व्यापारी केंद्रांशींही व्यवहार करणें तिला भाग पडलें व तिचा विस्तार वाढला. तिच्या आतां सुमारें ५० शाखा व कचेऱ्या आहेत. हिंदुस्थानांतील कच्चा माल झेकोस्लोव्हाकियाकडे पाठवून झेकोस्लोव्हाकियाचा माल हिंदुस्थानांत आयात करण्याच्या उद्देशानें " ऑम्निपोल ( इंडिया ) लि." नांवाची एक कंपनी मुंबई येथें स्थापन करण्यांत आली आहे. सर फिरोज सेठना हे तिचे अध्यक्ष आहेत.


रक्तपात
व
राज्यक्रांति
यांचें मनोवेधक वास्तवचित्र

: लेखक :
खांडेकर
: छाया लेखक :
पांडुरंग नाइक
: दिग्दर्शक :
विनायक
: हिंदीकार :
इंद्र
: चित्रकथा-संकलक :
जुन्नरकर
: संगीतकार :
घमणखां
: ध्वनिमुद्रक :
चिं. मोडक
: कलानियोजक :
पळनिटकर
: प्रकाशक :
SUPREME FILM DISTRIBUTORS, BOMBAY 4.

हंसचित्र

: भूमिका :
चंद्रमोहन
रत्नप्रभा
आशालता
रजनी
मांडरे
ढवळे
बुलबुले
जावडेकर
विनायक

ज्वालामधील गाणीं हि. मा. व्हॉ. कॉर्डसवर ऐका.

ज्वाला ज्वाला

## निवडक बाजारभाव

**बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून )** ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११८—४ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... ... | १०४—० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—० |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९७-१४ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०६—० |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | १००—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४०—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११२-८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०-१२ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११६-१२ |

### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९२२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५०—० |

### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२४—६ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २२२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २०५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३३३-१२ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४२०—० |

### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १५७—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४४—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १८—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ३७-१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४,३५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०६—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १७२—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २२७—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | ८९५—० |

### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३५-१५½ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ४८—५ |


घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

**संगीत-मार्गदर्शक**

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

**प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.**

**—कार्यक्रम—**

( १ ) वर्षप्रतिपदेला ( चैत्र शुद्ध १ )
मशिनरीच्या उभारणीला प्रारंभ.

( २ ) १९३९ च्या जानेवारींत
साखर करण्यास प्रारंभ.

**दरवर्षीं ५॥ टक्के व्याज**

व

दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.

सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेलः—

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड.**

२५७ बुधवार पेठ, बेलबागेसमोर,
भिडेवाडा, पुणें २.

**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth. Poona City.

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २१, किंवा प्रथम ६०८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.




पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.




स्टॉकिस्ट : मा. गो. कुळकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणें २.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

## पूना गेस्ट हाउस

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपती चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१६, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

**रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.**

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २॥, किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ महिने भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

**९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर**

**कामाची वेळः—**

**दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १**

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर-मुंबई.

यांचे ओरिजिनल

**ब्राह्मी तेल**

मेंदूचे विकार व डोकें दुखणें यावर

**बालंतकाढा**

नं. १ दहा दिवसांत घेणेचा.

नं. २ दहा दिवसांनंतर घेणेचा.

मुलांकरितां बाळकडू. कुमारी आसव

मुख्य दुकानः ठाकुरद्वार, शाखाः परळ व दादर.

पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें

अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.

सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

**SAHYADRI INS. Co**

NASIK

BEST TO CHOOSE & TO REPRESENT

WANTED WORKERS OF EITHER SEX.

Particulars by post or in person.

## संजीवन हेअर टॉनिक

दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.

**वन्देमातरम शिकाकई साबु**

स्टॉकिस्ट : मा. गो. कुळकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणें २.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
## गेस्ट हाऊस

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपती चौक—पुणें.

हवेशीर जागा

सुग्रास भोजन

उत्तम आदरातिथ्य.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.